दूरध्वनी क्रमांक- ०२२- २८३६७७६७
२२-२८३६१३१२
E-mail id dcpzone10.mum@mahapolice.gov.in

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन,
पोलीस विभाग.
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ -१० कार्यालय,
एमआयडीसी पोलीस स्टेशन बिल्डीग,सेंट्रल रोड,
एमआयडीसी, अंधेरी (पुर्व),मुंबई.४०००९३

पुण्यश्लोक 300

जा.क्र. :1408 /पोउआ/परि-१०/वा./२०२६.    दिनांक :- १६/०४/२०२६.

प्रति,
पोलीस उप-आयुक्त ,
(प्रकटीकरण) गुन्हे शाखा,
मुंबई

**विषय :- न्यायायालयीन प्रकरणांचा निकाल तपासी यंत्रणा अथवा अभियोक्त्यांच्या हलगर्जीपणामुळे शासनाच्या विरूद्ध गेला असल्यास, संबधीतांवर जबाबदारी निश्चित करण्यासाठी व त्याबाबतच्या शिफारसी करण्यासाठी गठीत समितीच्या माहे जानेवारी २०२६ ते मार्च २०२६ पर्यतचा त्रैमासिक अहवाल बाबत.**

**संदर्भ :- जा.क्र.४६८/पोउआ/प्रकटीकरण/गु.शा./२०१६ दिनांक ०६/०४/२०१६.**

उपरोक्त विषय व संदर्भास अनुसरून कळविण्यात येते की, न्यायालयीन प्रकरणांचा निकाल तपासी यंत्रणा अथवा अभियोक्त्यांच्या हलगर्जीपणामुळे शासनाच्या विरूद्ध गेला असल्यास, संबधीतांची जबाबदारी निश्चित करण्यासाठी व त्याबाबतच्या शिफारसी करण्यासाठी गठीत समितीच्या माहे जानेवारी २०२६ ते मार्च २०२६ पर्यंतचा त्रैमासिक अहवाल बाबत माहिती सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते. त्या अनुषंगाने परिमंडळ १० अंतर्गत अंधेरी, एमआयडीसी, मेघवाडी, जोगेश्वरी, साकीनाका, पवई पोलीस ठाण्याच्या मा. सत्र न्यायालयात निर्दोष सुटलेल्या खटल्यांची व त्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीची माहिती खालीलप्रमाणे असुन पुढील कार्यसाठी सस्नेह अग्रेषित.

| अ.क्र | घटक | बैठकांची संख्या | किती गुन्हयाच्या न्यायनिर्णयाची तपासणी करण्यात आली | शिस्तभंगाविषयक कारवाई करण्याबाबत किती प्रस्ताव पाठविण्यात आले | किती अधिकाऱ्यांविरूद्ध कारवाई करण्यात आली |
|---|---|---|---|---|---|
| १ | अंधेरी | १ | ०३ | ०० | ०० |
| २ | एमआयडीसी | | ०३ | ०० | ०० |
| ३ | मेघवाडी | | ०३ | ०१ | ०० |
| ४ | जोगेश्वरी | | ०१ | ०१ | ०० |
| ५ | साकीनाका | | ०५ | ०० | ०० |
| ६ | पवई | | ०१ | ०० | ०० |
| | **एकुण** | | **१६** | **०२** | **००** |

Pdr
22/04

Dy. Commissioner of Police (Detection)
Crime Branch C I D Mumbai

(दत्ता नलावडे)
पोलीस उप आयुक्त
परिमंडळ-१०, मुंबई

**प्रत माहितीकरीता सविनय सादर.**
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, मुंबई.

Scanned with CamScanner

ालयीन प्रकरणांचा निकाल तपासी यंत्रणा अथवा अभियोक्त्यांच्या हलगर्जीपणामुळे शासनाच्या विरूध्द गेला असल्यास संबंधितांवर जबाबदारी निश्चित करण्यासाठी व त्याबाबतच्या शिफारशी करण्यासाठी गठित ितीच्या बैठकांच्या दिनांक/कार्यवाहीची माहिती.

समितीची बैठक दिनांक ०७/०३/२०२६.

| क्र | पोलीस ठाणे | प्रकरण क्रमांक मा. न्यायालयाचे नाव /ठिकाण. | प्रकरण स्वरूप गु.र.क्र. कलम दिनांक व तपशील. | दोषारोप मा. न्यायालयात सादर केल्याचा दिनांक . | न्यायनिर्णय दिनांक. | न्याय निर्णयानुसार खटला निर्दोष सुटण्याची कारणे. | खटला निर्दोष होण्यामागे तपासी अधिकारी अथवा सरकारी अभियोक्ता हे जबाबदार आहेत अगर कसे? | जबाबदार असल्यास त्यांची नावे त्यांच्याविरूद केलेली/प्रस्तावित केलेली कार्यवाही. | शेरा. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | अंधेरी | मुंबई सीटी सेशन केस क्र ८६५/१९८९ कोर्ट क्र १६. | गु.र.क्र. २२४/१९८९ कलम ३०२ भादवि<br><br>**तपशील:** दिनांक २६/०५/१९८९ रोजी सकाळी ०९:४० वाजताच्या दरम्यान इस्मालिया बेकरीचा पोटमाळा मोगरापाडा अंधेरी पूर्व येथे आरोपीताने नजीर मोहम्मद वय २२ वर्षे यास पूर्ववैमनस्यातून जीवे मारण्याच्या इराद्याने लोखंडी हातोडीने त्याच्या डोक्यावर मारहाण करून गंभीर दुखापत केली म्हणून कलम ३०७भादवि अन्वये गुन्हा नोंद. जखमी इसमाचा नंतर उपचारादरम्यान मृत्यू झाला | ०८/०९/१९८९ | २९/०१/२६ | माहितीदार व प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांसह इतर महत्वाचे साक्षीदारांना समन्स बजावूनही दिलेल्या पत्त्यावर कोणताही साक्षीदार सापडला नाही. त्यामुळे घटनेच्या मुद्द्यावर कोणत्याही साक्षीदाराची उपस्थिती अभियोजनास मिळू शकली नाही. तपास अधिकारीसुद्धा हजर राहू शकले नाहीत. हे प्रकरण गेल्या ३५ वर्षापेक्षा अधिक काळ प्रलंबित आहे. अशा परिस्थितीत महत्वाच्या साक्षीदारांची उपस्थिती मिळण्याची शक्यता अत्यंत क्षीण आहे. नोंदींच्या पाहणीत आरोपीविरुद्ध पुढे कार्यवाही करण्यास कोणताही दोषारोपात्मक पुरावा उपलब्ध नाही. ठोस पुराव्याच्या अभावात प्रकरण वर्षानुवर्षे प्रलंबित ठेवण्यात कोणतीही उपयुक्तता नाही. त्यामुळे आरोपीविरुद्ध आरोप ठरविण्यास किंवा पुढील कार्यवाही करण्यास पुरेसे कारण नसल्याचे दिसून येते. प्रकरणाची जुनी तारीख व उपलब्ध सामग्री विचारात घेता पुढे कार्यवाही करून कोणताही उपयोग होणार नाही. त्यामुळे हा कलम ३०२ भा.दं.वि. अंतर्गत आरोपीस मुक्त करण्याचा योग्य प्रसंग आहे. मा. न्यायालयाने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २२७ अन्वये खटला चालविण्यास पुरेसा आधार नसल्याने आरोपीस खटल्यातून मुक्त (Discharged) करण्यात आले आहे. | नाही. | लागु नाही. | सदरचा खटला निर्दोष होण्यामागे तपासी अधिकारी अथवा सरकारी अभियोक्ता हे जबाबदार नाहीत. |

Scanned with CamScanner

| अ.क्र | पोलीस ठाणे | प्रकरण क्रमांक मा. न्यायालयाचे नाव /ठिकाण. | प्रकरण स्वरूप गु.र.क्र. कलम दिनांक व तपशील. | दोषारोप मा. न्यायालयात सादर केल्याचा दिनांक . | न्यायनिर्णय दिनांक. | न्याय निर्णयानुसार खटला निर्दोष सुटण्याची कारणे. | खटला निर्दोष होण्यामागे तपासी अधिकारी अथवा सरकारी अभियोक्ता हे जबाबदार आहेत अगर कसे? | जबाबदार असल्यास त्यांची नावे त्यांच्याविरुद्द केलेली/प्रस्तावित केलेली कार्यवाही. | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2. | एमआयडीसी | सेशन केस ५८७/२०१४ मुंबई सेशन कोर्ट मा. एस एस आडकर | १६०/२०१४ कलम ३०२ भादवि | १३/०८/२०१४ | २८/०१/२०२६ | १) सदर गुन्हातील फिर्यादी/बळीत या ४७ टक्के भाजुन मयत झाल्याने<br>२) बळीताची उपचाराची पुर्ण कागदपत्रे सादर केली नाहीत.<br>३) बळीत व आरोपीत यांचे मध्ये प्रेमसंबंध होते<br>४) सदरचे केस हा खुन नसुन तो अपघात असल्याचे निष्पन्न झाले आहे.<br>५)आरोपीताने बळीताचा खुन केला हे निष्पन्न णले ना | नाही | लागु नाही | सदरचा खट... होण्यामागे अधिकारी अ... अभियोक्ता हे नाहीत |
| 3. | एमआयडीसी | सेशनकेस क्रमांक ११५७/१९९३ व १२१०/१९९३ मा. अविनाश कुलकर्णी सिटीसेशन सेशन कोर्ट,मुंबई कोर्ट कमांक १० | २६/१९९३ कलम १४३,१४५,१४७, १४९,३०७,३०२, ४४८,४७, भादविसं | १२/११/१९९३ | २९/०१/२०२६ | १) आरोपीत क्रमांक १,२,५,७,९,१३,१४ हे मयत झाले आहेत<br>२) आरोपीत कमांक क ३,६,८,१००,११,१२ यांना गुन्हयांतुन डिस्चार्ज केले आहे.<br>३) गैरकायद्याची मंडळी जमविली हे सिध्द झाले नाही.<br>४) गुन्हयांचा वेळ व ठिकाण सिध्द होवु शकले नाही.<br>५) आरोपीतांनी कोणतीही प्रॉपर्टीचे नुकसान केले हे सिध्द झाले नाही.<br>६) आरोपीतांनी तलवार,सुरा लोखंडी रॉड, पाईप स्टिक घेवुन हल्ला केला हे सिध्द झाले नाही. सदर गुन्हयांतील साक्षीदार हे मिळुन आले नाहीत. | नाही | लागु नाही | [illegible] |

Scanned with CamScanner

| पोलीस ठाणे | प्रकरण क्रमांक मा. न्यायालयाचे नाव /ठिकाण. | प्रकरण स्वरूप गु.र.क्र. कलम दिनांक व तपशील. | दोषारोप मा. न्यायालयात सादर केल्याचा दिनांक . | न्यायनिर्णय दिनांक. | न्याय निर्णयानुसार खटला निर्दोष सुटण्याची कारणे. | खटला निर्दोष होण्यामागे तपासी अधिकारी अथवा सरकारी अभियोक्ता हे जबाबदार आहेत अगर कसे? | जबाबदार असल्यास त्यांची नावे त्यांच्याविरूद केलेली/प्रस्तावित केलेली कार्यवाही. | शेरा. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 4. मेघवाडी | मा.मुंबई सत्र न्यायालय, मुंबई | गु.र.क्र ८०/१४, कलम ३७६(२) (एन)(डी), ३७७, ३४ भा.द.वि. सह क. ४,६,८,१० पोक्सो अधिनियम २०१२ | १९/०६/२०१४ | १७/०२/२०२६ | खालीलप्रमाणे | नाही | लागु नाही | सदरचा खटला निर्दोष होण्यामागे तपासी अधिकारी अथवा सरकारी अभियोक्ता हे जबाबदार नाहीत. |

ळित मुलीच्या आईने तिचे साक्षमध्ये सन २०१४ मध्ये बळित हि वय १४ वर्षे असलयाचे सांगीतले व बळितेने तिची जन्मतारिख २९/०४/१९७ असे सांगीतले आहे. बळितिने तिचेकडे जन्मप्रमाणपत्र असल्याचे सांगीतले परंतु ते हजर केलेले नाही.

पासी अधिकारी यांनी मुलीचे जन्म प्रमाणपत्र शाळेतुन प्राप्त केल्याचे सांगीतले परंतु प्रमाणपत्र देणारे यांचेकडे तपासण्यात आलेले नाही व जन्म प्रमाणपत्र सिद्ध केलेले नाही.

मुलीचे वैद्यकिय अधिकारी देवकर यांनी साक्षीत मुलीचे वय सुमारे १७ वर्षे एक वर्ष फरकाने असे १७ ते १८ वर्ष असे सांगीतले आहे. त्यावरुन मुलीच्या वयाबाबत सांशंकता व्यक्त केली आहे. मुलीच्या वयाबाबत ऑसिफिकेशन टेस्ट केलेली नाही.

पडीतेच्या आईचे साक्षीत दिलेल्या माहितीवरून आरोपींना गुन्ह्याशी जोडता येत नाही. तिला दि.१५/०३/२०१४ रोजी काय घडले ज्ञान नाही. तिने तो पुरावा ऐकला आहे.

बळित मुलीने साक्षीत आरोपी हुज्मी यास स्वतःहुन बोलाविले आहे. व तिने घटनेबद्दल तिचे पालकांना सांगीतले नव्हते.

बळितेचे उलटतपासणी न करता तिचा पुरावा पाहता तिने स्वतःहुन तिच्या मित्रांना बोलाविले आहे. स्वतःहुन बिअर पिलेली आहे. तिने दिलेल्या पुराव्यावरुन शुद्धीवर होते तिला घडणाऱ्या सर्व गोष्टींचे ज्ञान होते. घटनास्थळाचे ज्ञान होते. तिच्या साक्षीवरून कोणी आरोपीने तिचेवर

क अत्याचार केला हे निष्पन्न होत नाही. तिने घरी येऊन कोणासही घटनेविषयी माहिती दिलेली नव्हती. ७)बळितेचे वर्तनावरुन दि.१५/०३/२०१४ रोजी तिचे सोबत काहीही घडले नसल्याचे दिसुन येत आहे.

गुन्ह्याचे तपासात आरोपींचे व बळितेचे संपर्क झाल्याचा पुरावा म्हणुन सिडीआर प्राप्त केलेले नाहीत. ९) यातील बळितेचे आई व बहिणचे जबाबावरुन नमुद आरोपींचा संबंध गुन्ह्यांशी जोडता येत नाही. तसेच ओळखपरेड मध्ये आरोपी नामे शौनक यास ओळखत नसल्याचे

तेने मान्य केले आहे व घटनास्थळी आरोपी शौनक असल्याचे सांगीतलेले नाही. १०) उलटतपासणीत, पीडितेने कबूल केले की तिच्या घराजवळच रुग्णालय आणि वैद्यकीय दुकान होते. तिने दि.२०/०३/२०१४ पर्यंत तिच्या पालकांना झालेल्या वेदना सांगितल्या नव्हत्या. ती

ालयात गेली नव्हती. तिला आठवत नाही की तिने हुज्मीला फोन केला होता आणि त्याने सर्व आरोपींची नावे सांगितली होती. ती विशेषतः कबूल करते की तिला कोणाकडून गुन्हा घडला आहे याबद्दल वैयक्तिक माहिती नव्हती.

१) यातील बळितेचे पुराव्यावरुन घटनेच्या सत्यतेबाबत संशय निर्माण होत आहे.

२) शेर ऐ पंजाब येथील घटनास्थळाचा पंचनामा केलेला नाही तसेच बळितेने सुद्धा घटनास्थळ दाखविलेले नाही. त्यामुळे तपासी अधिकारी यांनी घटनास्थळ पंचनामा केले नसल्याचे सांगीतले आहे. तसेच सि.सि.टि.व्ही. फुटेज घेतले नसल्याचे सांगीतले आहे. बळितेने जबरदस्तीने

से सांगीतले परंतु तिचे वैद्यकिय तपासणीत तसे दिसुन येत नाही.

३) होली स्प्रिट रुग्णालयाशी संलग्न डॉ. सुमान सोंडर यांच्या पुराव्यानुसार, तिने पीडितेची तपासणी केली आणि असे आढळून आले की मूत्रमार्गाच्या भागात सूज आली आहे. कोणत्याही बाह्य जखमा आढळल्या नाहीत. हायमेन फाटलेला होता. तसेच त्यांनी असे सादर केले की जर डितेला एक किंवा अधिक व्यक्तींनी जबरदस्तीने लैंगिक संबंध ठेवले असतील तर त्या जखमा शक्य आहेत. उलटतपासणीत, तिने कबूल केले की मूत्रमार्गाला सूज येणे ही अंतर्गत दुखापत आहे. ही दुखापत स्वतःहून किंवा परदेशी वस्तूच्या वापरामुळे किंवा हस्तमैथुनामुळे होण्याची

क्यता आहे.

४) वैद्यकिय अधिकारी रविंद्र देवकर, केईएम हॉस्पीटल यांनी बळितेच्या केलेल्या वैद्यकिय तपासणीत त्यांना आढळले की हाइमेन अनियमितपणे फुटले होते आणि कडा बऱ्या झाल्या होत्या. त्यांच्या मते, क्रॉनिक योनिमार्गात प्रवेश होता. शारीरिक शोषणाचे कोणतेही निष्कर्ष आढळले

ाहीत. त्यानुसार, त्यांनी अहवाल आणि केस पेपर्स तयार केले. उलटतपासणीत, त्यांनी कबूल केले की पीडितेची वैद्यकीय तपासणी करण्यासाठी सुमारे पाच दिवसांचा विलंब झाला. त्यांनी कबूल केले की विलंबामुळे पुराव्यावर परिणाम होतो. तसेच सायकलिंग, उडी मारणे किंवा इतर

क्रियाकलापांसारख्या विविध कारणांमुळे हाइमेन फुटू शकते. त्यांनी कबूल केले की १७ वर्षांच्या वयानंतर, हाइमेन सामान्यतः विविध कारणांमुळे फाटलेले आढळते. त्यांनी विशेषतः मान्य केले की या प्रकरणात, योनिमार्गात प्रवेश होऊ शकतो किंवा नसू शकतो.

१५) वर नमुद दोन्ही वैद्यकीय तज्ज्ञांच्या पुराव्यांची तपासणी केली असता, प्रथम असे दिसून येते की त्यांना पीडितेच्या शरीरावर बाह्य जखमा आढळल्या नाहीत. या संदर्भात, घटनेच्या ठिकाणाच्या पंचनाम्यावर भाष्य करणे आवश्यक आहे. हुज्मी यांनी फिर्यादीच्या म्हणण्यानुसार घटनेचे

ठिकाण दाखवले आहे. ते आरे कॉलनीच्या जंगलात २८ क्रमांकाच्या म्हशींच्या गोठ्यासमोर बाबुलच्या झाडाखाली घडले होते. जर खरोखरच ०४ क्रमांकाच्या बाबुलच्या झाडाखाली लैंगिक संबंध ठेवले असतील, तर निश्चितच पीडितेने तिच्या शरीरावर बाह्य जखमा केल्या असतील.

परंतु वैद्यकीय अधिकाऱ्यांना पीडितेच्या शरीरावर अशी कोणतीही जखम दिसून आली नाही. जी पीडितेच्या पुराव्यांच्या सत्यतेबद्दल शंका निर्माण करते.

१६) यात मा.एफएसएल कडुन सबळ पुरावा मिळुन आलेला नाही.

१७) बळितेचे आईने जबाबात मुलीचे घरातील, शेजारील व मित्रांबरोबर चांगले बोलणे नव्हते तसेच तिला रात्रीच्या वेळी जास्त वेळ बाहेर राहण्याची सवय होती. त्यामुळे तिला शांतीनगर आश्रमध्ये ठेवले होते. बळितेचे उलट तपासणीत कबुल केले आहे की, शांतीनगर आश्रमातुन पळुन

जाताना तिचे वाईट चारीत्र्याचे मित्र सोबत होते.

१८) पीडित आणि आरोपीच्या कपड्यांबद्दलच्या सीए अहवालांमध्ये आरोपीचा गुन्ह्याशी कोणताही संबंध दिसून आला नाही.

१९) सदर गुन्ह्यात जप्त केलेल्या मोटारसायकलींचा गुन्ह्याशी कसा संबंध आहे याचा कोणताही पुरावा सरकारी वकिलांना मिळू शकला नाही. म्हणून, या मोटारसायकली जप्त केल्यानेही आरोपीचा गुन्ह्याशी संबंध दिसून आला नाही.

२०) आरोपी घटनास्थळी उपस्थित होते आणि त्यांनी पीडितेला दारू पाजली असा कोणताही पुरावा रेकॉर्डवर नाही. आरोपीने तिच्यावर सामूहिक बलात्कार केल्याचा कोणताही पुरावा रेकॉर्डवर नाही. असा कोणताही पुरावा रेकॉर्डवर नाही जो सिद्ध करतो की आरोपींनी पीडितेशी शारीरिक संबंध ठेवले आहेत आणि पीडितेवर गंभीर लैंगिक अत्याचार केले आहेत. म्हणून, सर्व वाजवी शंकांपलीकडे आरोपीचा अपराध सिद्ध करण्यात सरकारी वकिलांना अपयश आले आहे. म्हणून, आरोपींना निर्दोष सोडले आहे.

करण्यात आली

Scanned with CamScanner

| अ.क्र | पोलीस ठाणे | प्रकरण क्रमांक मा. न्यायालयाचे नाव /ठिकाण. | प्रकरण स्वरूप गु.र.क्र. कलम दिनांक व तपशील. | दोषारोप मा. न्यायालयात सादर केल्याचा दिनांक . | न्यायनिर्णय दिनांक. | न्याय निर्णयानुसार खटला निर्दोष सुटण्याची कारणे. | खटला निर्दोष होण्यामागे तपासी अधिकारी अथवा सरकारी अभियोक्ता हे जबाबदार आहेत अगर कसे? | जबाबदार असल्यास त्यांची नावे त्यांच्याविरूद्ध केलेली/प्रस्तावित केलेली कार्यवाही. | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 5. | जोगेश्वरी | सेशन केस क्र. १५८/ २०१९ कोर्ट रूम क्र. ०९ मा. सत्र न्यायालय, दिंडोशी, मुंबई | १८/१९कलम ३५४(ड),३२३, ५०४ भादविसह क.१२ पोक्सो कायदा<br>**तपशील:-**<br>यातील आरोपीत इसम नामे संतोष मनिदर नारायण मिश्रा, २९ वर्षे याने त्याची कार ही फिर्यादी राहत असलेल्या नटवरनगर रोड नं. २ व रोड नं. ३ च्या मध्यभागी चंद्रमणी आवार, व्हील बिल्डींग, जोगेश्वरी पुर्व, मुंबई या बिल्डींगच्या समोर रस्त्यावर पार्क करून वेळोवेळी फिर्यादी यांची मुलगी वय ९ वर्षे ही टयुशनवरून जात आसताना तिच्या जाण्याच्या वेळेत वाईट हेतुने पाठलाग करून वारंवार तिच्यावर लाईन ठेवुन तिच्याकडे वाईट नजरेने बघितले व सदरबाबत फिर्यादी नामे त्यास जाब विचारला असता आरोपीने फिर्यादीस हाताने धक्काबुकी करून शिवीगाळ केली म्हणून गुन्हा नोंद | ०३/०४/२०१९ | ०५/०१/२०२६ | **दोषमुक्तीची कारणे:-**<br>१) फिर्यादी व पीडीत यांच्या साक्षीमध्ये विसंगती आढळली.<br>२) पंच हे फिर्यादी यांची ओळख असलेले दिसून आले.<br>३) पीडीतेने प्रथम घटना घडल्यानंतर फिर्यादी यांना घटनेबाबत सांगितले तेव्हा त्यांनी तात्काळ प्रथम खबर अहवाल नोंदवला नाही. यामुळे उशिराने फिर्याद दिल्याने फिर्यादी यांनी दिलेल्या पुराव्यावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले.<br>४) आरोपी हा पीडीतेचा पाठलाग करत होता याबाबत फिर्यादी व अभियोग पक्षास सक्षम पुरावे सादर करता आले नाहीत. | नाही | लागु नाही | सदरचा ख[illegible] होण्यामागे अधिकारी व अभियोक्ता नाहीत. |

Scanned with CamScanner

| | पोलीस ठाणे | प्रकरण क्रमांक मा. न्यायालयाचे नाव /ठिकाण. | प्रकरण स्वरूप गु.र.क्र. कलम दिनांक व तपशील. | दोषारोप मा. न्यायालयात सादर केल्याचा दिनांक . | न्यायनिर्णय दिनांक. | न्याय निर्णयानुसार खटला निर्दोष सुटण्याची कारणे. | खटला निर्दोष होण्यामागे तपासी अधिकारी अथवा सरकारी अभियोक्ता हे जबाबदार आहेत अगर कसे? | जबाबदार असल्यास त्यांची नावे त्यांच्याविरूद्ध केलेली/प्रस्तावित केलेली कार्यवाही. | शेरा. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 6. | साकीनाका | अतिरिक्त सिटी सिव्हील व सत्र न्यायालय कोर्ट क्र १८ कोर्ट केसक्र ३८०/२०१५ | गु.र.क्र. २५०/२०१५ कलम ३६३,३५४ भादवि सह ७,८ पोक्सो कायदा हकीकत- यातील नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील आरोपीत अज्ञात इसमाने फिर्यादी यांची मुलगी नामे खुशुमा समसुद्दीन शाह १७ वर्षे २ महिने हिस फिर्यादी यांचे कायदेशीर रखवालीतुन पळवुन नेले म्हणुन गुन्हा नोंद. | जुलै २०१५ | २७/११/२५ | पिडीत व फिर्यादी यांनी व्यवस्थीत पुर्ण साक्षा दिली नाही व फितुर झाल्याने सदर गुन्हयातुन निर्दोश मुक्तता केली आहे. | नाही | लागु नाही | सदरचा खटला निर्दोष होण्यामागे तपासी अधिकारी अथवा सरकारी अभियोक्ता हे जबाबदार नाहीत. |
| 7. | साकीनाका | अतिरिक्त सिटी सिव्हील व सत्र न्यायालय कोर्ट क्र १८ कोर्ट केसक्र ३५४/२०१३ | खालीलप्रमाणे | १५/०४/२०१३ | १९/१२/२५ | सबळ पुराव्या अभावि आरोपीतास सदर गुन्हयातुन निर्दोष मुक्तता केली आहे. | नाही | लागु नाही | सदरचा खटला निर्दोष होण्यामागे तपासी अधिकारी अथवा सरकारी अभियोक्ता हे जबाबदार नाहीत. |

र.क्र. ३५८/२०१० कलम १४३,१४७,१४८,१४९,४५२,३२३,५०४,५०६ (२),४२७,३९५,३९७,२०१,३४ भादवि हकीकत- सदर गुन्हयातील थोडक्यात हकिकत अशी की, सदर गुन्हयातील फिर्यादी श्री. झिम सिराज अहमद, वय-३७ वर्षे, धंदा-एस.जे.स्टुडीओ, रा.ठी. अमिनाबा चाळ, फ्लॅट नं. १२, आगा हॉल माझगाव, मुंबई-१० यांचे वडील नामे सिराज हमिद यांचे नावावर रजिस्टर्ड असलेले एस.जे.स्टुडीओ, खैरानी ड, साकीनाका, मुंबई येथे असून त्यांचे वडील जुन २०१० मध्ये मयत झाले असल्याने फिर्यादी व त्याचे भाऊ नामे श्री. साहिर हमिद हे दोघेजण त्यांचे राहते ठिकाणी माझगाव, मुंबई येथुन जावुन-येवून करतात. सदर टुडीओच्या आवारात एस.जे.स्टुडीओ समोर ३३ हजार २०० चौ.फु.मोकळी जागा असून सदर ठिकाणी नियोजित फिल्म स्टुडीओचे शेड बांधण्याचे कॉन्ट्रॅक्ट शेकप इंजिनियरींग कंपनीचे मालक श्री. बालन यांना दिले होते. दर कॉन्ट्रॅक्ट प्रमाणे दिनांक २०/०८/२०१० पासुन लोखंडी चॅनेल बनविणे व इतर कामकाज चालु होते. काम करणारे मजुर तात्पुरत्या स्वरूपात उभारलेल्या ( ३० बाय १० फुट) शेड मधील खोल्यांमध्ये राहत होते.

फिर्यादी यांचे वडील हयात असताना एवन ऑटो कंपनीचे प्रतिनिधी यांना ३ वर्षाचे करारावर सदरची मोकळी जागा शेड बांधून शोरूमकरीता वापरण्यासाठी सन २००६ मध्ये दिली होती. सदर एवन ऑटोचे मालक श्री. मनप्रितसिंग व फिर्यादी यांचे वडील सिराज अहमद यांचेमध्ये सदरचे कॉन्ट्रॅक्ट वरून काही वादविवाद झाल्याने दोघांच्याही संमतीने केलेले ॲग्रीमेंट करून सर्व नोंदी करून मालकी हक्क पुन्हा फिर्यादी व त्यांचे वडीलांना रत देण्यात आला. सदर ठिकाणी आरोपी नसिम शेख हा सुरक्षा एजन्सी चालवित होता. त्याने सदर जागेवर एप्रिल २००८ मध्ये २५-३० लोकांसह गैरकायद्याची मंडळी जमवुन जागेमध्ये प्रवेश करून जागेचा ताबा सोडण्यासाठी रु. ५ कोटी रक्कमेची मागणी केली. त्यानुसार सदर जागेचे मालक श्री. सिराज हमिद यांनी त्यांचेविरोधात दिलेल्या तक्रारीवरून साकीनाका पोलीस ठाणेस अर्जदार आरोपीसह २३ जणांचे विरूध्द वर नमुद प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला.

Scanned with CamScanner